मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » गुरुवार, दि. 23 जानेवारी 2025 | पान- 1

# युवतींच्या स्वप्नांना महापालिकेचे बळ

## उच्च शिक्षणासाठी परदेशात भरारी : कल्याणकारी योजनेअंतर्गत प्रत्येकी दीड लाखांचे अर्थसाहाय्य



**पिंपरी | प्रतिनिधी**

आर्थिक अडचणीमुळे परदेशातील उच्च शिक्षणाला मुकणाऱ्या युवतींना महापालिकेकडून प्रोत्साहनपर अनुदान दिले जाते. यंदाच्या वर्षी महिला व बालकल्याणमधून ८० युवतींनी तर मागासवर्गीय विभागातून ९ युवतींनी त्याचा लाभ घेतला आहे. गेल्या दोन वर्षांत ११३ युवतींना या योजनेच्या मदतीने परदेशात उच्च शिक्षण घेण्यास मदत झाली आहे. अशाप्रकारे अर्थसाहाय्य देणारी राज्यातील पिंपरी-चिंचवड ही पहिलीच महापालिका ठरली आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील युवतींना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी. याकरिता समाज विकास योजना विभागातून महिला व बालकल्याण आणि मागासवर्गीय योजनेंतर्गत परदेशात उच्च शिक्षण घेणाऱ्यांना मुलींना लाभ दिला जात आहे. तसेच, मुलींना अधिकाधिक उच्च शिक्षणाची संधी मिळाल्यानंतर त्या युवतींपासून इतरांना प्रोत्साहन मिळावे. या हेतूने महापालिकेकडून एक वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीच्या उच्च शिक्षणास दीड लाख रुपये अर्थसाहाय्य देण्यात येत आहे. त्यानुसार महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात ८० लाभार्थी युवतींना लाभ दिला, तर आणखी ३९ अर्ज प्रलंबित आहेत. त्यांनाही मार्चपर्यंत दीड लाखाचे अर्थसाहाय्य मिळणार आहे. तसेच मागासवर्गीय योजनेतून २०२३-२०२४ मध्ये २४ युवतींनी तर डिसेंबर २०२४ अखेर ९ युवतींना लाभ घेतला आहे.

ही योजना १२ महिने खुली असते. यंदाच्या वर्षी सन २०२४-२०२५ या वर्षात ३९ अर्ज पेंडिंग असून या योजनेतील अटी व शर्तीनुसार अर्जांची तपासणी केल्यानंतर पात्र लाभार्थ्यांना अर्थसाहाय्य दिले जाणार आहे. गेल्या दोन वर्षांत एकूण ११३ लाभार्थी युवतींना पालिकेने अर्थसाहाय्य केले आहे. त्यानुसार एक कोटी ६९ लाख ५० हजार रुपये अनुदान वाटप केले आहे. दरम्यान, या योजनेंतर्गत महापालिकेच्या नागरी सुविधा केंद्रांमधून महिला व बालकल्याण योजना व मागासवर्गीय कल्याणकारी योजनेचा जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन समाज विकास विभागाने केले आहे.

# त्रिवेणीनगर स्पाईन रोडच्या भूसंपादनाला 'बुस्टर'

## जिल्हा प्रशासनाकडून भूसंपादनासाठी निधीला मंजुरी



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे तळवडे येथे त्रिवेणीनगर चौक येथील 90 मीटर रुंद रस्त्याचा मार्ग मोकळा झाला आहे. 2008 पासून या रस्त्याचे काम भूसंपादनाअभावी प्रलंबित होते. अखेर भूमिसंपादनासाठी 15 कोटी 43 लाख 42 हजार 984 रुपयांना जिल्हा प्रशासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे भूसंपादन प्रक्रियेला 'बुस्टर' मिळाला आहे.

निगडी-भोसरी स्पाईन रस्त्याला अडथळा ठरणारी त्रिवेणीनगर चौकातील बांधकामे हटवण्यासाठी महापालिका प्रशासन प्रयत्नशील होते. मात्र, भूसंपादन आणि रस्ता बाधित नागरिकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित होता. त्यामुळे या भागात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली होती.

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने (PCNTDA) निगडीतील भक्ती-शक्ती चौक ते मोशी-भोसरी प्राधिकरण (नाशिक महामार्गावरील राजा शिवछत्रपती चौक) दरम्यान स्पाईन रस्ता विकसित केला आहे. 2011 मध्ये त्याचे काम पूर्ण झाले होते. मात्र, महापालिकेच्या हद्दीलगतच्या त्रिवेणीनगर येथील बाधितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न न सुटल्यामुळे सुमारे 320 मीटर लांबी व प्रस्तावित 90 मीटर रुंदीचा रस्ता गेल्या 14 वर्षांपासून रखडला हेता. भूसंपादन कामासाठी भरपाई देण्याकरिता आमदार महेश लांडगे यांनी जिल्हा प्रशासन आणि भूमि संपादन विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे.



# पुढील 20 वर्षांच्या प्रदूषणाचे नियोजन करा

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांच्या महापालिकेला सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील पुढील २० वर्षांची प्रदूषणाची स्थिती नक्की कशी असेल, त्यावर महापालिका प्रशासनानचे नियोजन काय असेल, याचा सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना प्रदूषण नियंत्रण मंडळाने महापालिकेला मंगळवारी केल्या आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे (एमपीसीबी) अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली.



महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांच्यासह प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पुणे महापालिकेला भेट देऊन प्रदूषण नियंत्रणासाठी महापालिकेच्या वतीने केल्या जाणाऱ्या उपाययोजनांची माहिती घेतली. यावेळी पुढील २० वर्षात शहरात प्रदूषणाची स्थिती कशी असेल त्यावर महापालिकेची उपाययोजना नक्की काय असेल, याचा सविस्तर अहवाल महापालिकेने प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर करावा, अशा सूचना केल्या.

महापालिकेत झालेल्या बैठकीत शहरातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, स्मशानभूमींमधील प्रदूषण नियंत्रण यंत्रणा, वायू प्रदूषण रोखण्यासाठीच्या उपाययोजना आणि घनकचरा व्यवस्थापन या चार प्रमुख विषयांवर सविस्तर चर्चा झाली. प्रदूषण कमी करण्यासाठी महापालिकेच्या वतीने केल्या जाणाऱ्या उपाययोजनांचे सादरीकरण यावेळी प्रशासनातील अधिकाऱ्यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांसमोर केले.

प्रदूषण कमी करण्यासाठी आवश्यक असलेला निधी राज्य सरकारच्या वतीने उपलब्ध करून देण्याची तयारी यावेळी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने दाखविण्यात आली. तसेच आवश्यक ते मार्गदर्शन व मदत महापालिकेला केली जाईल, अशी हमी देण्यात आली. घनकचरा व्यवस्थापनासाठी महापालिकेला जागा कमी पडत आहे. याबाबकत शासनाकडे पाठपुरावा करून महापालिकेला जागा मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल, असा शब्दही यावेळी देण्यात आल्याचे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी सांगितले.

नदीचे प्रदूषण कमी करण्यासाठी महापालिकेतर्फे 'जायका' प्रकल्पाअंतर्गत नवे दहा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारले जात आहेत. मात्र, त्यासाठी वेळ लागणार आहे. तोपर्यंतच्या काळात प्रक्रियेविनाच सांडपाणी नदीत सोडण्याऐवजी हे सांडपाणी निर्माण होणाऱ्या ठिकाणीच त्यावर प्रक्रिया करता येईल का? याची चाचपणी करण्यात यावी. प्रदूषण कमी करण्यासाठी सोसायट्यांमधील मैलापाणी प्रक्रिया केंद्र कार्यरत ठेवणे ही तेथील नागरिकांची जबाबदारी आहे. ती त्यांनी पार पाडलीच पाहिजे, अशी सूचनाही यावेळी करण्यात आली.

> स्मशानभूमीमधील पार्थिव दहनाचा विषय संवेदनशील आणि किचकट आहे. सर्व बाजूंनी योग्य समतोल राखून जळावू लाकडाला पर्याय देण्याचा आमचा प्रयत्न आहे. विद्युत, गॅस दाहिनी सारख्या पर्यायांना नागरिकांनी प्राथमिकता द्यावी यासाठी जनजागृती केली जाईल.
>
> **- सिद्धेश कदम, अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ.**

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोचे काम लांबणार

## मार्च 2025 पर्यंत मेट्रो धावण्याचे उद्दिष्ट : प्रकल्पाच्या कामाला सहा महिन्यांची मुदतवाढ

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंजवडी ते शिवाजीनगर या महत्त्वाच्या मेट्रो मार्गाला आणखी सहा महिन्यांचा कालावधी लागणार आहे. मार्च २०२५ पर्यंत मेट्रो धावण्याचे उद्दिष्ट संबंधित ठेकेदाराला पूर्ण करण्यात आले नाही. हे काम आता ऑक्टोबरपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. २३ किलोमीटरच्या या मार्गावर आणखी काही स्थानकांचे काम बाकी असल्याने मुदतवाढ मिळणार आहे.



पुणे प्रादेशिक क्षेत्रीय विकास प्राधिकरण यांच्याकडे हा प्रकल्प आहे. पीपीपी (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) या तत्त्वावर या प्रकल्पाचे काम सुरू आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून रखडलेल्या या कामाला जुलैनंतर गती मिळाली होती. मात्र, प्रत्यक्षात मेट्रोची डेडलाइन पाळण्यामध्ये संबंधित ठेकेदार अपयशी ठरला. हिंजवडी (माण, मेगा पोलिस) ते शिवाजीनगर पुण्यातील तिसरा मोठा मार्ग आहे. संपूर्ण मार्ग १८ ते २० मीटर उभ्या केलेल्या खांबांवर आहे. त्याचप्रमाणे पुणे-बंगळूर महामार्ग आणि मुळा नदीवर उभारण्यात आला आहे. या एकूण प्रकल्पासाठी ८३१३ कोटी रुपये खर्च होणार आहेत.

या कामाला नोव्हेंबर २०२१ मध्ये सुरुवात झाली. मात्र, मार्च २०२५ मध्ये हा प्रकल्प पूर्ण होऊ शकणार नाही. त्यामुळे मुदतवाढ मिळणार आहे. या मार्गावरील काही स्थानकांचे काम अपूर्ण असून, शिवाजीनगर (आरबीआय) आणि औंध येथील कामे संथ आहेत.

सद्य:स्थितीत ७९ टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यामध्ये पिलर उभारण्याचे काम शंभर टक्के पूर्ण झाले आहे. त्याचप्रमाणे २३ स्थानकांपैकी १२ स्थानकांची कामे पूर्ण झाली असून, इतर स्थानकांची कामे अपूर्ण आहेत. विविध ठिकाणी जिन्याचे आणि अकरा स्थानकांचे महत्त्वाचे काम बाकी आहे. यामध्ये प्रामुख्याने इंटरकनेक्ट काम असल्याने विद्यापीठ चौकात कामाची गती कमी आहे. रस्त्यावरील एचटी लाइनमुळेही अडथळा निर्माण झाला आहे.

### सप्टेंबरपर्यंत तरी मेट्रो धावणार का?

**» मेट्रोचा हा मार्ग पुढील सहा महिन्यांत पूर्ण होणे आवश्यक आहे. त्यानंतर ट्रायल रन आणि काम पूर्ण झाल्यानंतर मेट्रो प्रवासी वाहतुकीसाठी खुली करण्यात येईल. मात्र ही कामे सहा महिन्यांत पूर्ण होणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**

> प्रकल्पाचे काम मुदतीत पूर्ण होणार नाही. त्यामुळे मुदतवाढ दिली आहे. करारानुसार संबंधित कंपनीला दंड आकारण्यात येणार आहे. त्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
>
> **- डॉ. योगेश म्हसे, महानगर आयुक्त, पीएमआरडीए**

# व्हीजन@फिफ्टी शहर धोरण उपक्रमात गट चर्चेला सुरुवात

## पिंपरी-चिंचवड महापालिका स्थापनेला 2032 रोजी 50 वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने महानगरपालिकेने 'व्हिजन@50 शहर धोरण' हा उपक्रम हाती घेतला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका स्थापनेला २०३२ रोजी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने महानगरपालिकेने 'व्हिजन@५० शहर धोरण' हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाअंतर्गत विविध विषय आणि भविष्यात येणाऱ्या समस्यांवर महापालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची मते, सल्ले, उपाययोजना जाणून घेण्यासाठी आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर सभागृहामध्ये गटचर्चेचे (फोकस ग्रुप डिस्कशन) आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उपायुक्त विठ्ठल जोशी, सचिन पवार, साहाय्यक आयुक्त अजिंक्य येळे, क्षेत्रीय अधिकारी शीतल वाकडे, अमित पंडित तसेच विविध विभागांचे कार्यकारी अभियंता, उपअभियंता, आरोग्याधिकारी, कर्मचारी तसेच शहर परिवर्तन कार्यालयाचे सल्लागार उपस्थित होते. व्हिजन@५० शहर धोरण उपक्रमाअंतर्गत येत्या ७ वर्षांत महापालिका सेवांमध्ये सुधारणा करण्यावर भर देण्यात येणार आहे.

त्यामध्ये पिंपरी-चिंचवड शहरामध्ये सुधारणा करण्यासाठी दीर्घकालीन धोरण विकसित करणे, शहराचा सर्वांगीण विकास करणे, शहरातील प्रत्येक नागरिकाला शहराची ओळख निर्माण करण्याच्या कामास प्रवृत्त करणे, मुद्दे विकास धोरणात समाविष्ट करणे, चिरस्थायी पर्यावरणपूरक शहर आणि शहराची वेगळी ओळख निर्माण करणे व शहर विकासासाठी आवश्यक परिणामांची वेगवान अंमलबजावणी करणे आणि महानगरपालिकेचे कामकाज आणखी पारदर्शक होणे, या कामात नागरिकांचा सहभाग वाढवण्यावर भर देणे आदी गोष्टींचा समावेश आहे.

ही सर्व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शहरी गतिशीलता, पर्यावरण आणि राहणीमान, शिक्षण आणि कल्याण, तंत्रज्ञान आणि प्रशासन, शहरी पायाभूत सुविधा, आर्थिक विकास या प्रमुख विषयांवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. या सर्व विषयांना केंद्रस्थानी ठेवून गटचर्चेमध्ये सहभागी झालेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रश्नावली देण्यात आली होती. या प्रश्नावलीच्या आधारे उपस्थितांनी आपली मते किंवा भविष्यात उद्भवणाऱ्या विविध समस्यांवर उपाययोजना मांडल्या.



### पुढील 6 आठवडे भागधारकांसमवेत होणार गटचर्चा

» सर्व क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या विविध भागधारकांनाही व्हिजन@५० शहर धोरण या उपक्रमात सामील करून घेण्यात येणार आहे. यासाठी पुढील ६ आठवडे चालणाऱ्या या गटचर्चेमध्ये त्यांचा सहभाग वाढवण्यावर भर देण्यात येणार असून अधिकारी, कर्मचाऱ्यासमवेत त्यांनी मांडलेल्या प्रतिक्रिया, सल्ले, उपाय यावरही चर्चा करण्यात येणार आहे

> शहराला केवळ औद्योगिकनगरी म्हणून नाही तर आता स्मार्ट सिटी म्हणूनही ओळखले जाते. महानगरपालिकेस ५० वर्षे पूर्ण होत आहेत. तत्पूर्वी २०३२ पर्यंत व्हिजन@५० या उपक्रमाच्या माध्यमातून महापालिकेने काही ध्येय ठरवली आहेत. नागरिकांच्या गरजा समजून घेऊन शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी हा उपक्रम नक्कीच फायदेशीर ठरणार असून शहराचा सर्वांगीण विकास होण्यास यामुळे मदत मिळणार आहे.
>
> - विठ्ठल जोशी, उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग, महापालिका

> व्हिजन @५० शहरी धोरण उपक्रमातून शहरी विकासासाठी आवश्यक उपाययोजनांची नवी दारे उघडण्यास आणि आरोग्य, वैद्यकीय, पर्यावरण, शहरी गतिशीलता, शिक्षण, तंत्रज्ञान या प्रमुख विषयांवर लक्ष केंद्रित करून सर्वांगीण विकास साधण्यास मदत मिळणार आहे.
>
> - सचिन पवार, उपायुक्त, आरोग्य विभाग, महापालिका

# इंद्रायणीच्या प्रदूषणाबाबत केंद्राला साकडे; आळंदी ग्रामस्थांनी घेतली केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची भेट

## वाढत्या इंद्रायणी नदी प्रदूषणाबाबत राज्य पातळीवर पाठपुरावा करून थकलेल्या ग्रामस्थांनी अखेर केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची भेट घेत या समस्येवर तोडगा काढण्यासाठी साकडे घातले

**पिंपरी | प्रतिनिधी**

वाढत्या इंद्रायणी नदी प्रदूषणाबाबत राज्य पातळीवर पाठपुरावा करून थकलेल्या ग्रामस्थांनी अखेर केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची भेट घेत या समस्येवर तोडगा काढण्यासाठी साकडे घातले आहे. निदान केंद्रात असलेल्या राज्यातील मंत्र्यांनी प्रदूषणाबाबत गांभीर्याने दखल घ्यावी, अशी अपेक्षा आठवलेंकडे व्यक्त केली आहे.

वाढत्या इंद्रायणी नदी प्रदूषणाबाबत राज्य पातळीवर पाठपुरावा करून थकलेल्या ग्रामस्थांनी अखेर केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची भेट घेत या समस्येवर तोडगा काढण्यासाठी साकडे घातले आहे. निदान केंद्रात असलेल्या राज्यातील मंत्र्यांनी प्रदूषणाबाबत गांभीर्याने दखल घ्यावी, अशी अपेक्षा आठवलेंकडे व्यक्त केली आहे. दरम्यान, याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी ग्रामस्थांना दिले.

आळंदी इंद्रायणी सेवा फाउंडेशनतर्फे केंद्रीय मंत्री आठवले यांना निवेदन देण्यात आले. त्यावर उपाययोजना करण्याचे आदेश त्यांनी संबंधित विभागाला दिले. पर्यावरण विभाग, जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांना फोनद्वारे संपर्क करून येत्या आठ दिवसांत या समस्येकडे लक्ष केंद्रित करण्याबाबत सूचना दिल्या. त्याचप्रमाणे हा विषय गांभीर्याने घेऊन त्यावर स्वतः लक्ष घालण्याचे आश्वासन त्यांनी दिले. इंद्रायणी सेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष विठ्ठल शिंदे, दिलीप उत्तेकर, संतोष यादव, आदिनाथ साळवे आदी ग्रामस्थ उपस्थित होते. दरम्यान यानंतर पुण्याचे खासदार तथा केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना भेटूनही इंद्रायणी नदी प्रदूषणाबाबत लक्ष वेधले.

इंद्रायणीच्या प्रदूषणाचा विळखा दिवसेंदिवस वाढत आहे. इंद्रायणीकाठच्या विविध गावांतून मैलामिश्रित व रसायनयुक्त सांडपाणी प्रक्रिया न करता नदीपात्रात सोडत असल्याने रासायनिक पाण्याने नदी मोठ्या प्रमाणात फेसाळलेली दिसून येते. जुन्या बंधाऱ्याचे काही दरवाजे उघडे असल्याने तेथून हिरव्या व पिवळसर रंगाचे रसायनयुक्त सांडपाणी वाहात आहे. नदीपात्रात मोठ्या प्रमाणात पांढरा शुभ्र फेस निर्माण होत आहे. जुन्या बंधाऱ्याखालील नदीपात्रातील पाणी फेसाने झाकून जात आहे.



### प्रदूषणाचे ग्रहण सुटणार कधी?

» पवित्र इंद्रायणीचे प्रदूषण दूर करण्याचे आश्वासन अनेक राजकीय नेते आळंदीत आल्यानंतर देतात. मात्र यावर ठोस उपाययोजना राबवली जात नाही. मागील पंधरा दिवसांपूर्वी आळंदीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इंद्रायणीचे प्रदूषण थांबवण्यासाठी राज्य सरकारकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन दिले होते. मात्र अद्यापही परिस्थिती जैसे थे' आहे.

# पुणे महापालिकेने प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा शेतीसाठी वापर नाही

## पाण्याचा वाढीव कोटा मिळण्यासाठी जलसंपदामंत्र्यांनी केलेल्या सूचनेची अंमलबजावणी महापालिकेला आणखी काही वर्षे तरी अशक्य

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेने प्रक्रिया केलेले पाणी शेतीसाठी वापरण्यास जलसंपदा विभागाला अपयश आले असल्याचे माहिती अधिकारातून समोर आले आहे.

पाण्याची गरज भागविण्यासाठी पुणे महापालिकेने ३० ते ४० टक्के पाण्याचा पुनर्वापर करावा, धरणांमधील पाण्याचे आरक्षण बिगर सिंचनासाठी वाढविण्यास लागणारा भुर्दंड सोसावा. या अटींच्या पूर्ततेशिवाय पुण्याला अतिरिक्त पाणी वाढून देता येणार नाही, अशी स्पष्ट भूमिका जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतली आहे. प्रत्यक्षात मात्र, महापालिकेकडून सांडपाण्यावर प्रक्रिया केलेले पाणी वापरण्यास जलसंपदा विभागच कमी पडत असल्याचे माहिती अधिकारातून समोर आलेल्या माहितीवरून स्पष्ट झाले आहे.

पुणे शहर झपाट्याने वाढले आहे. लोकसंख्या वेगाने वाढत आहे. त्यामुळे पुणे महापालिकेला शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. महापालिका हद्दीतील अनेक भाग तहानलेले आहेत. त्यामुळे वाढीव पाण्याचा कोटा मिळण्यासाठी महापालिकेकडून राज्य सरकारकडे पाठपुरावा केला जात आहे. परंतु, या मागणीकडे दुर्लक्ष केले जात आहे. महापालिकेने हाती घेतलेला जायका प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरही शहरातील सर्व सांडपाण्यावर प्रक्रिया होणार नाही. पाण्याचा वाढीव कोटा मिळण्यासाठी राज्याचे जलसंपदामंत्र्यांनी केलेल्या सूचनेची अंमलबजावणी करणे पुढील काही वर्ष तरी पुणे महापालिकेला अशक्य होणार आहे. त्यामुळे पाण्याच्या वाढीव कोट्यासाठी पुणेकरांना आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे, तर दुसरीकडे पुणेकरांच्या पैशातून १०० कोटी रुपये खर्च करून पुण्यातील सांडपाण्यावर प्रक्रिया करून शेतीसाठी पुनर्वापर करण्याच्या योजनेतील ४० टक्केच पाणी जलसंपदा विभाग वापरू शकला आहे. पुण्याची वाढती लोकसंख्या, हद्दीत समाविष्ट होत असलेली गावे लक्षात घेऊन पुण्याचा पाण्याचा कोटा वाढला पाहिजे ही अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. मात्र, येत्या काही वर्षांत तरी ती पूर्ण होणे अशक्य आहे.

दरम्यान, जलसंपदा विभागाने पुणे शहरासाठी १४ टीएमसी पाणी कोटा मंजूर केला आहे. मात्र, महापालिका २१ टीएमसी पाणी उचलते. महापालिकेची वाढती हद्द आणि लोकसंख्येमुळे महापालिकेकडून पाण्याचा कोटा आणखी वाढवण्याची मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मंजूर कोट्यापेक्षा जास्त पाणी उचलत असल्याने महापालिकेला नोटीस बजावण्याचे आदेश जलसंपदाच्या अधिकाऱ्यांना दिल्याचे त्यांनी स्वतः माध्यमांना सांगितले होते.

शहरात दररोज १,७५० एमएलडी पाण्याचा वापर होतो. शहरात दररोज १,४०० एमएलडी मैलामिश्रित पाणी निर्माण होते. या पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी महापालिकेने शहरात विविध ठिकाणी ९ मैलापाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) बांधले आहेत. या एसटीपी प्रकल्पामध्ये दररोज ३६७ एमएलडी पाण्यावर प्रक्रिया केली जाते. हे पाणी प्रक्रिया करून नदीत सोडले जाते, तर उर्वरित मैलामिश्रित पाणी थेट नदीत मिसळते.

या पार्श्वभूमीवर महापालिकेने केंद्र सरकारच्या मदतीने शहरातील मुळा-मुठा नदी सुधार प्रकल्प राबविण्याचे नियोजन केले आहे. या प्रकल्पासाठी जपान इंटरनॅशनल को. ऑफ. एजन्सीच्या (जायका) जपानच्या कंपनीने केंद्र शासनाच्या माध्यमातून महापालिकेला ८५० कोटीचे अनुदान दिले आहे. या प्रकल्पांतर्गत शहरात ११ ठिकाणी एसटीपी प्रकल्प, ५५ किलोमीटर मैलापाणी वाहिन्या टाकल्या जाणार आहेत. या प्रकल्पांतर्गत १० एसटीपी प्रकल्पांची कामे सुरू आहेत. जायकाचे काम पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण शहराचे ९६३ एमएलडी मैलापाणी प्रक्रिया करून नदीत सोडण्यात येणार आहे.



### पुणेकरांचे 100 कोटी खर्च करून फायदा काय?

» पुणे शहराला चार धरणांचं वरदान लाभले आहे. ज्यामध्ये २९ टीएमसी पाण्याचा साठा होतो. हे पाणी पुण्याच्या पाण्याची तसेच दौंड-इंदापूरपर्यंतच्या शेतीची तहान भागवते. पुण्याने जास्त पाण्याची मागणी केली की शेतीला पाणी कमी पडू शकते आणि विनाकारण शहरी विरुद्ध ग्रामीण असा संघर्ष उभा राहतो. म्हणून पुण्याने वापरलेले पाणी प्रक्रिया करून शेतीला पुनर्वापरासाठी मिळावे, याकरिता महापालिकेने २०१५ मध्ये पुणेकरांचे १०० कोटी रुपये वापरून मुंढवा जॅकवेल येथे पुण्याचे सांडपाणी प्रक्रिया करून शेतीसाठी पुनर्वापर करण्यासाठी प्रकल्प उभारला. यात दररोजचे ५५० एमएलडी अर्थात वर्षाला ६.५ टीएमसी सांडपाणी प्रक्रिया करून शेतीसाठी पुनर्वापर करण्यासाठी उपलब्ध करण्याची क्षमता निर्माण केली गेली. मात्र आपला जलसंपदा विभाग हे पाणी वापरण्यास कमी पडला. माहिती अधिकारात मिळालेल्या माहितीनुसार २०१६ पासून २०२४ डिसेंबर अखेरपर्यंत ९ वर्षांत क्षमतेच्या जेमतेम ३५ टक्के (२२.५ टीएमसी) प्रक्रिया केलेले सांडपाणी जलसंपदा विभाग शेतीसाठी पुनर्वापर करू शकला. १ जानेवारी २०२५ पासून आजपर्यंत तर १० टक्के क्षमतेने पण शेतीसाठी पाणी उचलले गेले नाही. हे जलसंपदा विभागाचे मोठे अपयश आहे, असे सजग नागरिक मंचचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी सांगितले.

# बारामती जिल्ह्याचा प्रस्ताव शासनापुढे नाही

## मंत्री विखे पाटील यांचे बारामती विमानतळावर स्पष्टिकरण, सोलापूर जिल्ह्यातील टेंभुर्णी येथे कामानिमित्त जात असताना बारामती विमानतळावर पत्रकारांशी विखे पाटील बोलत होते

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती जिल्ह्याचा कोणताही प्रस्ताव शासनापुढे नाही. मी महसूलमंत्री म्हणून काम केल आहे, त्यामुळे अशा प्रकारची कोणतेही चर्चा नाही. या सर्व बातम्या कपोलकल्पित आहेत, असे प्रतिपादन जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

सोलापूर जिल्ह्यातील टेंभुर्णी येथे कामानिमित्त जात असताना बारामती विमानतळावर पत्रकारांशी विखे पाटील बोलत होते. यावेळी त्यांच्यासमवेत माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार उपस्थित होते.



### पालकमंत्री पदावरून कोणीही नाराज नाही – शेलार

» पालकमंत्री पदावरून कोणीही नाराज नाही, मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री आपसात संवाद साधत आहेत. यावर कोणतेही नाराजी नाट्य नाही. तसेच बीड आणि परभणी घटनेवर ज्यांना राजकारण करायचा आहे ते करतील,आरोपी पकडले आहेत, एसआयटी काम करीत आहे. संबंधित आरोपींवर गुन्हे दाखल झाले आहेत.दोन्ही घटनेत न्याय मिळाला पाहिजे अशी आमची भूमिका आहे. दोन्ही परिवारांच्या दुःखाचं राजकारण कोणीही करू नये, असे आवाहन माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी केले आहे.

### 1 रुपया पीक विमा बंद होण्याच्या वावड्याच

» शेतकऱ्यांसाठी असलेला 1 रुपया पीक विमा बंद होण्याबाबत कोण वावड्या उठवत आहे. हे मला कळत नाही. एवढे मोठे बजेट येत आहे. 1 रुपया पीक विमाच्या सकारात्मक परिणाम शेतकऱ्यांवर होत आहे, त्यामुळे या विमा बद्दल शेतकऱ्यांमध्ये उत्सुकता आहे. पूर्वी विमा कंपनीची जी घरे भरली जात होती, आता उलटी परिस्थिती आहे, शेतकऱ्यांना एवढी मोठी मदत झाली असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सष्ट केले.

राज्यातील पालकमंत्रिपदाच्या नाराजी नाट्यावर विखे पाटील म्हणाले की, मला वाटतं नाही, यात नाराज असण्याचे कारण नाही प्रत्येक नेत्याला वाटतं की हा जिल्हा मला मिळावा, महायुतीत अशी अनेक प्रसंग येत राहतात,कारण आमचा प्रपंचा आहे.

एवढा मोठा महाजनादेश महायुतीला मिळालेला आहे, त्यामुळे साहजिकच अपेक्षा वाढल्या आहेत. तिन्ही नेते मिळून एकत्रित मार्ग काढतील. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाराज नाहीत शिंदे सातत्याने आपल्या दरे या गावी जात असतात, ते काही पहिल्यांदाच तिकडे गेले आहेत का? असे त्यांनी नमूद केले.